टंचाईग्रस्त गावांतील नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा करण्याबाबत . . .

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-१०१३/प्र.क्र. ०१ /पापु-०७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : २५ मार्च, २०१३

वाचा : १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बैठक २००८/ प्र.क्र.१५४६/ ऊर्जा- ५, दिनांक २४ जुलै, २००८

२. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.देप्रोअ १३०९/प्र.क्र.६९/पापु-०७.दि.१७ ऑगस्ट,२००९

३. शासन परिपत्रक, पापुवस्ववि. क्र. ग्रापाधो-१११२/ प्र.क्र.५०/ पापु-०७, दि. २७ मार्च, २०१२

४. शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.५०/पापु-०७.दि.७ डिसेंबर, २०१२

५. शा.नि., क्रमांक ग्रापाधो-१०१३/प्र.क्र. ०१/पापु-०७, दि ७ जानेवारी, २०१३.

**प्रस्तावना :**

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेऊन, स्वतंत्र ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या वीज देयकांची अदायगी न झाल्याने त्या बंद होऊ नये म्हणून राज्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांच्या स्वतंत्र ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची, दिनांक १ एप्रिल,२०१२ पासून चालू वीज देयकांच्या ६७% रक्कम, महावितरण कंपनीस अदा करण्याबाबतचा निर्णय शासनाच्या उपरोक्त अ.क्र.५ येथील दिनांक ७ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

त्याप्रमाणेच ज्या नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये २०% पेक्षा जास्त टंचाईग्रस्त गावांचा ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये समावेश आहे, अशा नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची ६७% वीज देयकांची रक्कम अदा करण्याबाबत, मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ मार्च,२०१३ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, टंचाईग्रस्त गावांतील नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा न झाल्याने त्या बंद होऊ नयेत म्हणून राज्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांच्या नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची जानेवारी,२०१३ ते जून,२०१३ अखेरपर्यंत सहा महिन्याच्या कालावधीची वीज देयकांची ६७ % रक्कम महावितरण कंपनीस अदा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या शासन निर्णयाचा लाभ घेण्यास पात्र असणा-या राज्यातील १४० प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना व त्यातील टंचाईग्रस्त गावांचा तपशील सोबतच्या जोडपत्रामध्ये कृपया पहावा. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल :

१) संदर्भाधीन दि. ७ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांनाच टंचाईग्रस्त भागाच्या नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेंची ६७ % रक्कम अदा करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सदस्य, तर, कार्यकारी अभियंता, महावितरण हे सदस्य सचिव आहेत.

सदर समितीमध्ये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे.

२) ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांमधील किमान २०% पेक्षा जास्त पाणी टंचाईग्रस्त गावांचा समावेश नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये आहे, अशा नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या वीजेच्या चालू देयकांची ३३ % रक्कम अदा केल्यास, परिच्छेद-१ मधील समितीने त्या बिलाच्या उर्वरित ६७ % रक्कम महावितरण कंपनीस अदा करावयाची आहे. याकरिता समितीच्या बैठकीत कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी संबंधित नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची सविस्तर माहिती सादर करावी. या समितीच्या बैठका किमान दर १५ दिवसांनी घेण्यात याव्यात. या बैठकीत ज्या नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या वीज देयकांची ३३ % रक्कम भरली नसेल, त्यांची माहिती समितीच्या निदर्शनास आणून त्यांना ही रक्कम भरण्याकरिता समितीच्या वतीने कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी १५ दिवसांची मुदत द्यावयाची आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी टंचाईग्रस्त क्षेत्रातील नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या संबंधीत अधिकाऱ्यांना वीज देयकांची ३३ % रक्कम महावितरण कंपनीस अदा करण्याच्या सुचना द्याव्यात. समितीच्या पुढच्या सभेपर्यंत जर त्या नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची ३३ % रक्कम भरली तर त्यांच्या बिलाच्या उर्वरित ६७ % रक्कम समितीने महावितरणकडे जमा करावी.

३) संदर्भाधीन शासन परिपत्रक दि. २७/३/२०१२ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सदर देयके अदा करण्यासाठी बँक खाते उघडण्यात आलेले आहे.

४) महावितरण कंपनीस अदा करावयाच्या ६७ % रकमेपैकी ५० % रक्कम जिल्हा परिषदेकडील तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील देखभाल व दुरुस्ती निधीतून तर उर्वरित १७ % रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे शासनाकडून २२४५ लेखाशीर्षाखाली प्राप्त झालेल्या रकमेतून द्यावयाची आहे.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी त्यांच्याकडील देखभाल दुरुस्ती निधी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त होणारा देखभाल दुरुस्तीसाठीचा निधी, राज्यस्तरावरुन देखभाल व दुरुस्तीसाठी प्राप्त झालेले अनुदान व जिल्हा परिषदेच्या इतर निधीमधून वीज देयकांसाठी लागणारी ५० % एवढी रक्कम जिल्हाधिकारी समितीच्या बचत खात्यामध्ये तात्काळ जमा करावी. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरण कंपनीस अदा करावयाची १७ % रक्कम २२४५ लेखाशीर्षामधून त्यांच्या बचत खात्यात जमा करावयाची आहे.

६) या शासन निर्णयान्वये महावितरणला द्यावयाची रक्कम अदा करण्याकरिता जर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असलेला देखभाल व दुरुस्ती निधी कमी पडत असेल तर त्यांनी सदर अधिकची रक्कम उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा. याप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध इतर तरतुदींमधून पुनर्विनियोजनाद्वारे जिल्हा

परिषदेला देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व हा निधी प्राप्त झाल्याबरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या खात्यात जमा करावा. पुर्नविनियोजनाद्वारे जिल्हा नियोजन समितीला अधिकचा निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे मागणी करावी. याच प्रकारे जिल्हाधिकाऱ्यांना २२४५ लेखाशीर्षामधून १७ % रक्कम देण्याकरिता अनुदान कमी पडल्यास मदत व पुनर्वसन विभागाकडे अनुदानाची मागणी करावी. जिल्हाधिकारी यांच्या समितीकडे देण्यात आलेल्या निधीचे व महावितरणकडे अदा करण्यात आलेल्या रकमेचा हिशोब नियमितपणे ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील.

२. या शासन निर्णयाचा त्याचप्रमाणे, समक्रमांकाच्या दि.०७ जानेवारी,२०१३ च्या शासन निर्णयाचा लाभ झाल्याने, ज्या गावांमधील स्वतंत्र व प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांद्वारे प्रति दिन प्रति माणशी २० लिटर्स किंवा त्यापेक्षा जास्त पिण्याचे पाणी उपलब्ध होत असेल, तर अशा गावांमध्ये पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत अन्य उपाययोजना घेतल्या जाणार नाहीत, याची संबंधितांनी काळजी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०३२५१९०२३५८२२८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
विधानमंडळ सदस्य (सर्व)
मुख्य सचिव यांचे उप सचिव
अपर मुख्य सचिव, (महसूल वन विभाग)
प्रधान सचिव(उर्जा),उद्योग, उर्जा व कामगार विभाग
प्रधान सचिव,ग्राम विकास व पंचायत राज
प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग
प्रधान सचिव ,नियोजन विभाग
सचिव, महसूल वन विभाग (मदत व पुनर्वसन)
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी म.
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
सर्व कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

२० टक्के पेक्षा जास्त गावे टंचाई ग्रस्त असलेल्या नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना व त्यामधील गावांचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र

| Sr. No. | Name of RRWSS | District | Number of Villages/Wadies | | | Nos of Scarcity villages | Scarcity village name | Agency (MJP/ZP/Committee) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Villages | Wadies | Total | | | |
| 123 | Bhindon and 7 Villages | Aurangabad | 8 | 0 | 8 | 8 | Bhindon, Bhindon tanda, Shivgad, Gawali wadi, Pardari tanda, Beganaik tanda, Dhangar wadi, Sahastramuli | ZP |
| 124 | Chowka Phulambri | Aurangabad | 2 | 0 | 2 | 2 | Chowka,Phulambri. | ZP |
| 125 | Lohgad Ndra and 2 Villages | Aurangabad | 3 | 0 | 3 | 4 | Sultanwadi, Lohgad Nandra, Bhoygaon | ZP |
| 126 | Kanhori and 2 Villages | Aurangabad | 3 | 0 | 3 | 3 | Kanhori, Lahanyachiwadi, Kabadyachi Wadi | ZP |
| 127 | Lingdari 2 Villages | Aurangabad | 2 | 0 | 2 | 2 | Lingdari, Kankora. | ZP |
| 128 | Manjari Maholi and Muddeshwadgaon | Aurangabad | 3 | 0 | 3 | 3 | Manjari, Maholi, Muddeshwadgaon. | ZP |
| 129 | Hingoni Kangoni | Aurangabad | 2 | 0 | 2 | 2 | Hingoni, Kangoni. | ZP |
| 130 | Mudhalwadi and 3 Villages | Aurangabad | 4 | 0 | 4 | 4 | Mudhalwadi , Kaigav, Narayangaon, Wahegaon | ZP |
| 131 | Wadwali and 3 Villages | Aurangabad | 4 | 0 | 4 | 4 | Wadwali, Waghadi, Apegaon, Anandpur | ZP |
| 132 | Takali Ambad and 3 Villages | Aurangabad | 4 | 0 | 4 | 4 | Takali Ambad, Awade anchegaon, hiradpuri, Ghevari. | ZP |
| 133 | Kadethan (Bk) and 1 Villages | Aurangabad | 2 | 0 | 2 | 2 | Kadethan (Bk), Kadethan (kh) | ZP |
| 134 | Mulani Wadgaon and 10 Villages | Aurangabad | 11 | 0 | 11 | 12 | Mulani Wadgaon , Bramhagavan, Mavasgavan, Lamgavan, Jogeshwari, Balapur, Manikapur, Shevata, Loligaon, Tanu Pimpalwadi, Amrapur Waghundi. | ZP |
| 135 | Dadegaon Jahangir | Aurangabad | 2 | 0 | 2 | 3 | Dadegaon jahagir, Saigaon, Nalkarwadi | ZP |
| 136 | Chawadala and 2 Village | Aurangabad | 3 | 0 | 3 | 3 | Chowndhala, Chinchala,Khandal | ZP |
| 137 | Paraudi and 1 Village | Aurangabad | 2 | 0 | 2 | 2 | Paraudi, Paraudi Tanda | ZP |
| 138 | 22Villages RRWSS (Tal-Umarga & Lohar) | Osmanabad | 22 | 0 | 22 | 16 | Toramba, salegaon, kalder sindala, kalasimbala,samudral, murshadpur, rajegaon, holi, petisangaw, yakondi(lo), marangwadi, babhalsur, naichakar , matola kawatha Makani- Chincholi(K) Tavashigad | ZP |
| 139 * | Wadhi and 3 Villages RRWSS | Osmanabad | 5 | 0 | 5 | 4 | Wadhi, Hiwara, Pardi, Handongri | ZP |
| 140 | Indapur Golegaon Combind RRWSS | Osmanabad | 2 | 0 | 2 | 2 | Indapur, Golegaon | Committee |
| | No of RRWSS = 140 | | 1268 | 744 | 2035 | 1178 | - | |